# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P)२३३४७६९(O)Fax-२३५६८२०

http://www.dteau.orgEmail-roaurangabad.dte@gmail.com


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७/०८३

दिनांक :- 2 MAR 2017

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद/जालना/अंबड/बीड/उस्मानाबाद

पु.ला.लातुर/शा.नि.म.तंत्रनिकेतन, लातुर/नांदेड/जिंतुर/हिंगोली

**औरंगाबाद विभाग**

**विषय :-** तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध बांधकामांचा समग्र आढावा..

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.९/बांधकाम/२०१७/४५ दिनांक १४/०२/२०१७

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतनांच्या संस्थेत सुरू आहेत. सदर बांधकामांचा वेळोवेळी आढावा घेऊन सदर बांधकामे वेळेत पूर्ण करण्यासाठी व बांधून पूर्ण झालेल्या इमारती कार्यान्वित करण्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. ज्या संस्थेत बांधकाम सुरू आहेत अशा संस्था प्रमुख यांनी सदर बांधकामाबाबतचा आढावा दर २ महिन्यानी या कार्यालयास सादर करण्यात यावा. जेणे करून सदरील कामाबाबतचा प्रगती अहवाल या कार्यालयाकडून संचालनालयास सादर करण्यात येईल.

२. चालू आर्थिक वर्षात संचालनालयाच्या अधिपत्याखालील २३ बांधकामांकरिता प्रशासकीय मान्यता देऊन तरतुद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.चालु वर्षात ही कामे पूर्ण होऊन विभागास हस्तांतरीत होतील.सदर इमारतीमध्ये आवश्यक विद्युत पुरवठा व वायरींग तातडीने करून घेऊन सदर इमारती ताब्यात घ्याव्यात. यासाठी आवश्यक फर्निचर व त्यासाठी आवश्यक निधी याचा प्रस्ताव संचालनालयास सादर करण्यात यावा.

३. वसतीगृहातील मेसमध्ये स्वतंत्र किचन तसेच किचनमधील भांडारगृह तयार करण्यात यावे. भांडारागृहामध्ये तसेच किचन कटयाखाली कडप्पा घालून कपाटे तयार करून घेऊन बाहेरील बाजुस भांडी धुण्यासाठी नळ इत्यादी सुविधा आताच करून घेण्यात याव्यात.

४. शासकीय तंत्रनिकेतन, बीड येथील संगणक इमारत व मुलींचे वसतीगृह या इमारतीचे पूर्ण होवून देखील संस्थेत हस्तांतरीत झालेले नाहीत. याची नेमकी कारणे काय आहेत ती उपलब्ध करून द्यावीत तसेच इमारत ताब्यात घेण्याबाबत आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यात यावी.

५. अत्यंत गरज असेल अशाच ठिकाणी शैक्षणिक संस्थेतील प्राध्यापक कर्मचा-यांसाठी निवासस्थान बांधकामाची मागणी करण्यात यावी.

६. दैनंदिन परिक्षणासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करण्यात यावा.

या बाबतची माहिती या कार्यालयास दर दोन महिन्यानी या कार्यालयास विनाविलंब सादर करण्यात यावी.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सादर.